# जी.डी. बापू लाड महाविद्यालयात लीड कॉलेज अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा

वार्ताहर
कुंडल

येथील क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये लीड कॉलेज अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

क्रांती अग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या कॉमर्स विभागाअंतर्गत ग्राहक चळवळ व ग्राहक संबंध व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेमध्ये प्रा. सुनिल जोशी यांचे ग्राहक चळवळी विषयी व्याख्यान तर प्रा. डॉ. राजश्री चव्हाण यांनी व्यवस्थापन व ग्राहकसंबंध याविषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्वागत प्रा. के.एम. नलवडे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. खारगे व संध्या शिंदे यांनी केले तर आभार प्रा. सुनील जाधव यांनी आभार मानले.

दै. तरुण भारत - ०५/०१/२०१६

# जी. डी. बापू महाविद्यालयाच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन

कुंडल : येथील क्रांतीअग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये प्राध्यापक प्रबोधीनींच्यावतीने सातारा येथील प्रा. सौ. मिनाक्षी भोसले यांनी उपस्थित प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. इम्पॅक्ट ऑफ इंटरनेट बँकींग ऑफ बँक परफॉर्मन्स ॲण्ड रिस्क वुईथ रेफरन्स टू बॅंक्स इन सातारा डिस्ट्रिक्ट या विषयावर भोसले यांचे व्याख्यान झाले.

GPG

दै. तरुण भारत - ०५/०७/२०१६

# आठ महाविद्यालयांत झाले चुरशीने मतदान

## 'यिन' निवडणुकीचा दुसरा टप्पा उत्साहात

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. २१ : महाविद्यालयीन तरुणाईमध्ये उत्सुकता निर्माण केलेल्या 'यिन' महाविद्यालय प्रतिनिधी पदाच्या निवडीसाठी जिल्ह्यातील आठ महाविद्यालयांत आज चुरशीने आणि उत्साहपूर्ण वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली. मतदानाच्या निमित्ताने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भावी राजकारण आणि समाजकारणाचा धडाच गिरवला.

यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क अर्थात 'यिन' च्या महाविद्यालय प्रतिनिधी निवडीसाठी दुसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी आज सकाळी आठ महाविद्यालयांत दहा वाजता सुरवात झाली. निवडणुकीसाठी इच्छुक असलेले उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदानास प्रारंभ झाला. उमेदवार आणि त्यांचे समर्थक यांच्यातील उत्साह आणि खेळीमेळीचे वातावरण दिसून आले.

पलूस येथील भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे चुरशीने मतदान झाले. या ठिकाणी चार उमेदवार रिंगणात होते. मतदान प्रक्रियेचे संयोजक प्राचार्य एम. एस. देशमुख, प्रा. पी. टी. मोहिते, एम. जे. साळुंखे, आर. पी. पाटील उपस्थित होते.

अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालय आष्टा येथे प्राचार्य डॉ. ए. एम. मुल्ला, प्रा. आर. व्ही. पेटकर यांच्या उपस्थितीत मतदान प्रक्रिया पार पडली. येथे तीन उमेदवार रिंगणात होते. अण्णासाहेब डांगे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज आष्टा येथे प्राचार्य पी. ए. बुद्रुक,

पान २ वर »



आष्टा : 'यिन'च्या निवडणुकीसाठी आण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालयात मतदानासाठी रांग लागली होती.



पलूस : भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे उपस्थित प्राचार्य एम. एस. देशमुख.



इस्लामपूर : मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयात मतदानासाठी झालेली गर्दी.



कुंडल : येथील क्रांती अग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात युवतींनी मोठ्या उत्साहात मतदान केले.

### 'यिन'चे नेटके संयोजन

'यिन'चे जिल्हा उपाध्यक्ष पौर्णिमा उपळावीकर, सदस्य पांडुरंग गयाळे, विवेक पवार, शुभम शेळके, सुजाता साबळे, प्रशांत जाधव, पौर्णिमा कदम, शुभम जाधव यांनी निवडणूक मतदानासाठी नेटके संयोजन केले. समन्वयक अर्जुन पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

SEVENMANTRAS © 77740 20777 / 98817 98817 Call Now... or log on to www.sevenmantras.com

PTO

दै. सकाळ 22/01/2016

# कर्तृत्ववान लोकांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवा : प्रा. महाले

कुंडल : वार्ताहर

आपण दुसऱ्यामध्ये सुख शोधत राहिलो, तर त्याचा आनंद आपल्याला मिळतो. दुसऱ्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातलेली माणसे आज महान झाली आहेत. कर्तृत्ववान लोकांच्या आदर्शाचा अवलंब केला पाहिजे, असे मत प्रा. कैलास महाले यांनी व्यक्त केले.

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रम संस्कार शिबिरात 'खरंच आयुष्य खूप सुंदर आहे' या विषयावर बोलत होते.

प्रा. महाले पुढे म्हणाले , मोबाईल तंत्रज्ञानामुळे आजची युवा पिढी प्रत्यक्ष संवादापासून दूर गेली आहे. त्यामुळे देशाची प्रगती खुंटत चालली आहे. माणसामध्ये स्वार्थी प्रवृत्ती वाढली आहे. माणूस फक्त स्वतःचा विचार करत आहे. येणाऱ्या प्रत्येक क्षणाच्या आनंदाने स्वीकार केला, तर आपले आयुष्य सुंदर होईल. वेळेचे मूल्य आपण जाणून घेतले पाहिजे.

यावेळी प्रा. एन. के. गुंड, प्रा. जे. ए. पाटील, प्रा. एस. जी. चवरे, प्रा. कु. एस. पी. खरात, एम. के. पाटील, नारायण पाटील उपस्थित होते.

अक्षय कोळी यांने स्वागत केले. राहुल देवकाते याने प्रास्ताविक केले. राहुल देवकाते यांनी आभार मानले.

# जीवनात आनंद महत्त्वाचा : आवटे

कुंडल : वार्ताहर

मानवी जीवनामध्ये आज सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे आनंद होय. आज माणूस ताणतणावात जीवन जगत आहे. तरी या ताणतणावातून आनंदच माणसाला दीर्घायुषी ठेवू शकतो, असे विचार सुप्रसिद्ध कथाकथनकार जयवंत आवटे यांनी मांडले. ते क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरातील प्रबोधन मालेत बोलत होते.

अध्यक्षस्थानी नारायण पाटील होते. कार्यक्रम अधिकारी एन. के. गुंड, प्रा. जे. ए. पाटील, प्रा. एस. जी. चवरे, प्रा. पी. बी. लुपणे, प्रा. कु. एस. पी. खरात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुसेन पवार यांनी केले. सुनील पवार यांनी आभार मानले.

दै. केसरी ता- २५/०१/२०१६

तरुण भारत २8/1/16

# युवकांनी श्रमदानाचे महत्व ओळखावे

## शरद लाड यांचे प्रतिपादन : श्रमदानाच्या सवयीने होतेय जबाबदारीची जाणीव

वार्ताहर
कुंडल

श्रमदानाच्या सवयीने आपल्याला जबाबदारीची जाणीव राहते. व त्यामुळे आमली सर्वांगीण प्रगती होते. याकरिता युवकांनी श्रमाचे महत्व ओळखून आळस झटकून कामाला लागावे असे आवाहन सांगली जिल्हा युवक राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष शरद लाड यांनी केले.

ते घोगांव ता. पलूस येथे क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड, महाविद्यालय कुंडलच्या वतीने आयोग्याने केलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी घोगांव चे उपसंरपंच संदीप पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.एम.नलवडे डॉ. प्रताप लाड, प्रा. एन. के. गुंड उपस्थित होते.

लाड म्हणाले, युवकांनी आपला




कुंडल : विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना शरद लाड.

जास्तीत जास्त वेळ अभ्यासामध्ये खर्च केला पाहिजे. त्याचबरोबर खेळाकडे लक्ष देवून आपल्या करिअरच्या दृष्टिने प्रयत्न करावे. आणि याकरीता अभ्यास करणे गरजेचे आहे.

यावेळी एन.एस.एस चे प्रमुख एन के गुंड यांनी श्रमसंस्कार शिबिराची माहिती दिली. या शिबिरामध्ये गटचर्चा, मुख्य मार्गदर्शनपर व्याख्याने यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ.गायकवाड, जिल्हा समन्वयक प्रा.कैलास महाल जोशी यांची व्याख्यान झाली तर या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप पाटील शिक्षण समहाचे प्रमुख लाड यांच्या हस्ते झाले.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी ग्रामसेवक बरोबरच पाणी अडवा पाणी जिरवा या अंतर्गत बंधारा घालणे इ. कामे केली.

या विशेष श्रमसंस्कारामुळे गावातील लोकांना श्रमाचे महत्व पटवून देण्यास व लोकांना श्रमदान करणे करिता प्रेरित केल्याबद्दल उमसरपंच संदिप पाटील यांनी समाधान व्यक्त केले. या श्रमसंस्कार शिबिराकरिता सर्व ग्रामस्थ सर्व ग्रामपंचायत सदस्य सरपंच लक्ष्मीबाई गोरे, उपसरपंच संदिप पाटील, ग्रामविकास अधिकारी, सर्व संस्था हायस्कूल विकास सोसायटीचे पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले.

शिबिरास प्रा.के.एन.नलवडे, शहाजी लाड, किरण लाड, प्रा. जगन्नाथ पाटील, एस. जी. चौरे, पी. सी. लुपणे, प्रा. शुभांगी खरात, शांताराम धुमाळ यांचे सहकार्य लाभले.

क्लासिफाईड दक्षिण महाराष्ट्र केसरी वाढं

28/1/16

# राष्ट्रीय सेवा योजनेमुळे आत्मविश्वास निर्माण : प्रा. मोरे

**कुंडल : वार्ताहर**

धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम फक्त राष्ट्रीय सेवा योजनाच करू शकते, असे मत राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. सदाशिव मोरे यांनी व्यक्त केले. क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या घोगाव (ता. पलूस) येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात बोलत होते.

प्रा. मोरे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेतूनच युवकांची जडणघडण होते. सामाजिक काम करण्यास युवकांनी लाजू नये.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. संगीता पाटील म्हणाल्या, जिद्द व महत्त्वाकांक्षा राष्ट्रीय सेवा योजनेमुळे मिळते. कार्यक्रमास प्रा. डॉ. आर. एस. साळुंखे, प्रा. एन. के. गुंड, प्रा. एस. जी. चवरे, प्रा. डॉ. पी. बी. जुपणे उपस्थित होते.

## श्रमदानाने जबाबदारीची जाणीव राहते : लाड

**कुंडल : वार्ताहर** दै. केसरी 28/1/16

श्रमदानाने आपला अहंकार निघून जातो. आपल्याला जबाबदारीची जाणीव राहते व त्यामुळे आपली सर्वांगीण प्रगती होते. युवकांनी श्रमाचे महत्त्व जाणून समाजकार्य करावे, असे आवाहन सांगली जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद लाड यांनी केले.

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या घोगाव (ता. पलूस) येथील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमास रामराव माळी, डॉ. प्रताप लाड, नाराचण पाटील, पी. एम. पाटील, उपसरपंच संजय पाटील, बाबूराव शिंदे, प्रा. जे. ए. पाटील, प्रा. जी. एन. खारगे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

## महिला सबलीकरण काळाची गरज : डॉ. गायकवाड

दै. केसरी

**कुंडल : वार्ताहर** 28/1/16

आजच्या विज्ञान युगात 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' आणि महिला सबलीकरण काळाची गरज बनली आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड यांनी व्यक्त केले.

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या घोगाव (ता. पलूस) येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरातील व्याख्यान प्रसंगी बोलत होते.

प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे म्हणाले, स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियान उस्फूर्तपणे राबविले पाहिजे. स्वागत व प्रास्ताविक प्रा. जे. ए. पाटील यांन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे सल्लागार डॉ. एम. पाटील, प्रा. एन के. गुंड, प्रा. पी. बी. लुपणे, प्रा. कु. एस. पी. खरात, घोगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

## शीतपेये, बेकरी पदार्थ खाणे टाळा : पवार

**कुंडल : वार्ताहर**

शीतपेये, बेकरी पदार्थ टाळले पाहिजेत. शारीरिक, मानसिक आरोग्य चांगले असणे गरजेचे आहे, असे मत आरोग्य अधिकारी रागिणी पवार यांनी व्यक्त केले.

पवार पुढे म्हणाल्या, पिझ्झा, बर्गर, नूडल्स यासारख्या पदार्थांनी शरीराची हानी होते. अन्न शरीराच्या सवयी, आहार, आरोग्य यांचा ताळमेळ पाहिजे. शरीरात भरपूर प्रथिने घेतली पाहिजेत. शरीराला योग्य व्यायाम झाला पाहिजे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजाराम माळी होते. कार्यक्रमास नारायण पाटील, प्रा. एन. के. गुंड, प्रा. जे. अे. पाटील, प्रा. पी. बी. लपने प्रा